MHLA050000602019

निमयती दिवाणी दावा क्र. ०७/२०१९
अनुसया वि. महा. शासन वगैरे

**आदेश नि.क्र. ७५ वर**

प्रतिवादी क्र.५ ने हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्याच्याविरूध्द वादीचा उलट तपास नाही असा झालेला आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.५ च्या वकीलांचे म्हणणे असे की प्रतिवादी क्र.५ याने नि.क्र. ६९ व ७१ वर पारीत करण्यात आलेले आदेश मे. उच्च न्यायालयात आव्हानीत केले होते. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ न्यायालयात हजर राहिला नाही. त्यामुळे त्याच्याविरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. वादीच्या वकीलांचे म्हणणे असे की वादी हा तिन वेळेला न्यायालयात हजर होता. मात्र, प्रतिवादी क्र.५ याने त्याचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे न्यायालयाने उचित आदेश पारित केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचा दावा वादीचे सामाजीक स्थान निश्चीत करण्यासाठी व वादीला निवृत्तीवेतन देण्याबाबत आदेशीत करण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीने दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.५ हिने मयत मोहनराव जयवंतराव जगताप

यांच्यासोबत सन १९७३ मध्ये केल्याचे कथन केले आहे. अशापरिस्थितीत प्रतिवादी क्र.५ मार्फत वादीचा उलटतपास घेतल्यास सत्य परिस्थिती समोर येणार आहे. तसेच, पक्षकारांचे हक्क व अधिकार गुणदोषावर ठरवण्यासाठी प्रतिवादी क्र.५ यास वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित होणार आहे. तथापी वादीने सरतपासाचे शपथपत्र दाखल केल्यानंतर अनेक संधी देवूनही उलटतपास का घेवू शकले नाही याचे संयुक्तिक कारण दिलेले नसल्याने सदर अर्ज मंजूर करतांना प्रतिवादी क्र.५ वर खर्च बसवणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

नि. क्र. ५६ वर प्रतिवादी क्र.५ विरुध्द वादीचा उलट तपास नाही हा झालेला आदेश खर्च रक्कम रू. २००/– वादीस देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.03.28 17:13:46 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक २८/०३/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपुर.